**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004 MAHARASHTRA**
**Colleges and University Development Section**
PHONE :EPABX-2609000, 2609145
□ FAX :0091-231-2691533 & 0091-231-2692333
Website : www.unishivaji.ac.in E-mail: stats@unishivaji.ac.in
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर -४१६००४ महाराष्ट्र(महाविद्यालये व विद्यापीठ विकास विभाग)**
**दुरध्वनी: (ईपीएबीएक्स) २६०९०००, २६०९१४५**
□ **फॅक्स: ००९१-२३१-२६९१५३३,२६९२३३३,२६९३२९४**

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
ज्ञानमेवामृतम्
Estd: 1962
NAAC "A" Grade

जा.क्र. एस.यु/म.व.वि.वि.विभाग/ 516 दिनांक : 24 JUL 2018

प्रति,
**मा. अधिविभागप्रमुख / संचालक/ समन्वयक,**
सर्व अधिविभाग / अभ्यास केंद्रे,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय : उपयोगिता प्रमाणपत्र व विवरण पत्र (Utilization Certificate and Statement of Expenditure) सादर करण्याबाबत.**

**संदर्भ : (१) या कार्यालयाचे जा.क्र. SU/C.U.D. Section/ ६, दि. १/०४/२०१६ रोजीचे परिपत्रक**
**(२) या कार्यालयाचे जा.क्र. SU/C.U.D. Section/१०४, दि. ३०/०४/२०१६ रोजीचे परिपत्रक**
**(३) या कार्यालयाचे दि. २०/०९/२०१६ रोजीचे परिपत्रक**
**(४) या कार्यालयाचे जा.क्र. एस.यु/ म.वि.वि.विभाग/९३३, दि. २२/०१/२०१८ रोजीचे परिपत्रक**

महोदय / महोदया,

विविध वित्तीय शिखर संस्थांकडून विविध योजना / प्रकल्प/ अभ्यास केंद्रे / शिष्यवृत्ती नियोजीत असलेल्या मार्गदर्शक नियमावलीनुसार प्राप्त झालेल्या निधीच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र व विवरण प्रमाणपत्र हे मंजूर कालावधीतील प्रत्येक आर्थिक वर्षाच्या १५ मे पूर्वी त्या – त्या वित्तीय संस्थेच्या विहीत नमुन्यात शिखर संस्थांना प्राप्त होणे आवश्यक आहे. तथापि, काही प्रकल्प, योजना अंतर्गत सन २०१७-२०१८ या कालावधीमधील उपयोगिता प्रमाणपत्र व विवरण संबंधीत वित्तीय संस्थेस अद्यापि पाठविण्यात आलेले नाहीत.

आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, विविध शिखर संस्थांकडून प्राप्त झालेल्या अनुदानाची त्या - त्या वित्तीय संस्थांच्या मार्गदर्शक नियमावलीतील विहीत नमुन्यात विनीयोग दाखला,उपयोगिता प्रमाणपत्र, प्रगती अहवाल इ. (Utilization Certificate and Statement of Expenditure, Progress Report, Advisory Committee Reoport (if any) etc.) तयार करुन लेखा पी. जी. बील्स विभागाकडे एकूण सात प्रतीमध्ये सादर करावेत. विहीत वेळेत सादर न झालेल्या उपयोगिता प्रमाणपत्रांची संबंधीत वित्तीय संस्थेने दखल न घेतल्यास त्यास संबंधीत जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी. तसेच ज्यांचे विीनयोग दाखला व उपयोगिता प्रमाणपत्र हे अंतिम वर्षाचे असतील त्यांनी थेसिस स्वरुपातील विस्तारीत प्रगती अहवाल ज्या – त्या शिखर संस्थेच्या नियमावलीप्रमाणे आवश्यक तेवढ्या प्रतीमध्ये वरील दस्तऐवजांसोबत सादर करणे आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे ज्यांचा निधी अद्यापी अप्राप्त आहे त्यांनी उपयोगिता प्रमाणपत्रामध्ये त्याची मागणी करणे आवश्यक आहे. अखर्चित निधी संबंधीत वित्तीय संस्थेस परत पाठवावयाचा असल्यास उपयोगिता प्रमाणपत्र व इतर अनुषंगीक दस्ताऐवज लेखा विभागामार्फत मान्य होऊन प्राप्त झालेनंतर तसा प्रस्ताव महाविद्यालये व विद्यापीठ विकास विभागात सादर करणे आवश्यक आहे. ज्यांनी अद्यापि, विहीत नमुन्यात विनीयोग दाखला,उपयोगिता प्रमाणपत्र, प्रगती अहवाल इ. संबंधित शिखर संस्थेस पाठविलेले नाहीत त्यांनी सदरची कागदपत्रे दि. ३१/०७/२०१८ पूर्वी या विभागास कार्यालयास सादर करावीत.

सदरचे पत्र हे आपल्या विभागातील सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून वरीलप्रमाणे पूर्तता करुन घ्यावी.
कळावे,

आपला विश्वासू,

**कुलसचिव**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रत माहितीसाठी :
१) लेखा (पी.जी.बील्स) विभाग
२) लेखा (कॅशबुक) विभाग